
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 5 | JUNE – 2025

# परिवर्तनवादी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे

डॉ. कैलास अंभुरे
संचालक, विद्यार्थी विकास/ मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर – ४३१००४. (महाराष्ट्र)

**सारांश (Abstract):**



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनप्रवासाचा, साहित्याचा आणि वैचारिक योगदानाचा प्रस्तुत शोधनिबंधात विचार केला आहे. अण्णा भाऊंनी मराठी साहित्यातील पारंपरिक, स्वप्नाळू आणि अभिजनवादी चौकटी मोडीत काढून शोषित, दलित, कष्टकरी आणि उपेक्षित स्त्रियांना साहित्याच्या केंद्रस्थानी नायक म्हणून प्रस्थापित केले. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद (वर्गमुक्ती व जातमुक्ती) या दोन महान विचारसरणींचा अपूर्व समन्वय साधत, त्यांनी पोवाडा, लावणी आणि तमाशा यांसारख्या लोककलांना समाजपरिवर्तनाचे प्रभावी हत्यार बनवले. प्रस्थापित समीक्षक व राजकीय व्यवस्थेने त्यांची उपेक्षा केली असली तरी, ग्रामीण आणि महानगरीय वास्तवाचे दाहक चित्रण करणारे त्यांचे विद्रोही साहित्य आज जागतिक पातळीवर वंदनीय ठरले आहे. अण्णा भाऊ खऱ्या अर्थाने परिवर्तनवादी महामानव होते.

**मुख्यशब्द (Keywords):**

अण्णा भाऊ साठे, लोकशाहीर, दलित साहित्य, मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद, परिवर्तनवादी साहित्य, साहित्यिक उपेक्षा, वास्तववाद, लोककला, महानगरीय वास्तव.

## प्रस्तावना

मराठी साहित्याच्या इतिहासात अनेक प्रतिभावंत साहित्यिक झाले; पण त्यांपैकी काही साहित्यिकांना हयातभर उपेक्षित ठेवले गेले, नव्हे तर, मृत्यूपश्चात्यही त्यांच्या साहित्याची यथोचित दखल घेतली गेली नाही. अशाच एका प्रतिभावंताचे नाव म्हणजे साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे होय. अण्णा भाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते एक महान लोकशाहीर, परिवर्तनवादी विचारवंत, लढाऊ कार्यकर्ता आणि शोषितांचे कैवारी होते. सांगली जिल्ह्यातील वाटेगावसारख्या एका छोट्याशा खेड्यात, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जन्मलेला हा माणूस आपल्या प्रतिभेच्या जोरावर थेट रशियाच्या मॉस्कोपर्यंत पोहोचला. त्यांचा हा प्रवास जागतिक साहित्याच्या इतिहासातील एक थक्क करणारी घटना आहे.

जातीय भेदभाव, आर्थिक दारिद्र्य आणि राजकीय उपेक्षा या त्रिविध संकटांशी झुंज देत त्यांनी आपल्या लेखणीतून मराठी साहित्याला एक नवीन दिशा दिली. अण्णा भाऊंच्या साहित्याने मराठी साहित्याच्या पारंपरिक, साचेबद्ध आणि अभिजनवादी चौकटी मोडीत काढल्या. ज्या उपेक्षित, वंचित, दलित आणि शूद्रातिशूद्र घटकांना साहित्यात स्थान नव्हते, त्यांना त्यांनी केवळ स्थानच दिले नाही, तर त्यांना साहित्याच्या केंद्रस्थानी नायक म्हणून उभे केले; परंतु त्यांच्या वाट्याला उपेक्षा आली.

अण्णा भाऊंचा काळ हा मराठी साहित्यात रोमँटिसिझमचा (स्वच्छंदतावाद) सुवर्णकाळ मानला जातो. कलावादाचे पुरस्कर्ते ना. सी. फडके आणि जीवनवादाचे पुरस्कर्ते वि. स. खांडेकर यांच्या कादंबऱ्या मध्यमवर्गीय वाचकांच्या मनावर राज्य करत होत्या. अशा काळात अण्णा भाऊंनी काल्पनिकतेच्या, स्वप्नाळू, केवळ शृंगारिक जगात न रमता, आपल्या भोवतालच्या वास्तवाचे दाहक, नग्न आणि प्रखर चित्रण करण्यास प्राधान्य दिले. त्यांनी आपल्या साहित्यातून केवळ दुःख मांडले नाही, तर त्या दुःखाच्या मुळाशी असणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर प्रहार केला. त्यांच्या साहित्याने शोषितांची व्यथा, वेदना मांडली नाही, तर त्या दुःखाविरुद्ध लढण्याची, बंड करण्याची आणि स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची प्रेरणा दिली.

मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या दोन महान जागतिक विचारसरणींचा एक अपूर्व समन्वय अण्णा भाऊंच्या साहित्यात आहे. 'जग बदल घालुनि घाव, मला सांगून गेले भीमराव' ही त्यांची गर्जना त्यांच्या संपूर्ण साहित्याचा, जगण्याचा आणि विचारांचा गाभा आहे. त्यांनी मार्क्सला अभिप्रेत असणारी 'वर्गमुक्ती' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारी 'वर्णमुक्ती' वा 'जातमुक्ती' या दोन प्रवाहांचे एकत्रिकरण केले. त्यांच्या साहित्यातून प्रकट होणारे विश्व हे केवळ कल्पनेचे विश्व नसून ते रक्तामांसाच्या, घाम गाळणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध झुंजणाऱ्या माणसांचे विश्व आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून जे काही उतरवले, ते त्यांनी स्वतः अनुभवले होते. त्यांच्या साहित्यातील भाषेचा लहेजा, तिथली ग्रामीण शब्दकळा आणि महानगरीय यंत्रसंस्कृतीची भाषा ही त्यांच्या अनुभवाच्या प्रखरतेची साक्ष देते. साहित्याला केवळ मनोरंजनाचे साधन मानणाऱ्या तत्कालीन प्रवृत्तीला अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून एक मोठे आव्हान दिले. त्यांच्या मते, साहित्य हे परिवर्तनाचे साधन असावे आणि ते समाजातील शेवटच्या माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी, त्याचे जगणे सुसह्य करण्यासाठी वापरले जावे. याच भूमिकेतून त्यांनी साहित्य निर्मिती केली आणि मराठी साहित्याला एक नवीन परिमाण मिळवून दिले. त्यामुळे अण्णा भाऊ खऱ्या अर्थाने 'परिवर्तनवादी साहित्यिक' ठरले.

### अण्णा भाऊ साठे यांचा जीवन प्रवास : संघर्षाची महागाथा

अण्णा भाऊ साठे यांचा जीवनप्रवास हा दारिद्‌य्र, संघर्ष, जिद्द आणि मानवी अस्मितेची एक मोठी गाथा आहे. त्यांच्या ४९ वर्षांच्या अल्पायुष्यात त्यांनी जे काही अतुल्य कार्य केले, ते पाहता त्यांची परिस्थिती, प्रतिभा आणि कार्य यांचा त्रिवेणी संगम अद्भूत वाटतो. त्यांच्या जीवनाचे प्रामुख्याने चार टप्पे मानले जातात, जे त्यांच्या वैचारिक आणि साहित्यिक जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचे आहेत.

### टप्पा १: वारणेचे खोरे - जन्म, बालपण आणि सामाजिक वास्तव

अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे. वडील भाऊराव साठे व आई वालुबाई साठे. तत्कालीन समाजव्यवस्थेत अण्णा हे अस्पृश्य म्हणवल्या जाणाऱ्या मातंग जातीत जन्माला आलेले. शिवाय, घरी दारिद्‌य्र. यातच ब्रिटिश काळात या समाजावर 'गुन्हेगार जात'

असा शिक्का मारण्यात आला होता. या समाजाकडे शेती नव्हती; उपजीविकेसाठी त्यांना चोरी, वाटमारी करावी लागायची. वाटेगावच्या मांगवाड्यातील अण्णा भाऊंची झोपडी गावाच्या पूर्वेकडील टोकावर होती. गुन्हेगार ठरवल्या गेलेल्या या समाजाला शिक्षणापासून आणि सन्मानापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले गेले होते. परिणामी अण्णा भाऊंना केवळ काही दिवस शिक्षण घेता आले. वारणेच्या खोऱ्यातील हा परिसर नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असला, तरी तेथील सामाजिक स्थिती अत्यंत विषम आणि क्रूर होती. वाटेगावच्या मातीतील संघर्ष, तिथली लोकसंस्कृती, तिथल्या कष्टकरी लोकांचे जगणे आणि जातीव्यवस्थेचा जाच अण्णा भाऊंनी अत्यंत जवळून पाहिला होता.

वाटेगावमधील बालपणात अण्णा भाऊंनी तिथली लोकसंस्कृती आत्मसात केली. जरी त्यांना शाळेत जाण्याची संधी मिळाली नाही, तरी निसर्ग आणि समाज हीच त्यांची खरी शाळा ठरली. तिथल्या शेतमजुरांचे कष्ट, सावकारांचा अमानुष जाच आणि जातीव्यवस्थेची क्रूरता त्यांनी अत्यंत कोवळ्या वयात अनुभवली होती. एकदा शाळेत जाण्याचा प्रयत्न केला असता, तिथे त्यांना मिळालेली हीन वागणूक त्यांच्या मनात कायमची घर करून बसली. या अनुभवांनी त्यांच्यात अन्यायाविरुद्धची चीड निर्माण केली, जी पुढे त्यांच्या साहित्यातून विद्रोहाच्या रूपाने बाहेर पडली. त्यांच्या 'वारणेचा वाघ' सारख्या कादंबऱ्यांमधील बंडखोरीची मुळे याच बालपणातील अनुभवांमध्ये दडलेली आहेत. १९३१ मध्ये दुष्काळ पडला. या दुष्काळाने साठे कुटुंबाला उपासमारीच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. वडिलांची शेतजमीन सावकाराने बळकावून घेतली. या परिस्थितीत कुटुंबाने मुंबईला स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला.

## टप्पा २: वाटेगाव ते मुंबई - स्थलांतर, कष्टप्रद जीवन आणि साक्षरतेचा ध्यास

अण्णा भाऊंचे वडील भाऊराव साठे यांनी कुटुंबासह मुंबईची वाट धरली. वाटेगाव ते मुंबई हा सहाशे किलोमीटरचा प्रवास अण्णा भाऊंनी आपल्या कुटुंबासह पायी केला. हा प्रवास केवळ भौगोलिक नव्हता, तर तो एका युगातून दुसऱ्या युगात होणारा प्रवास होता. मुंबईला आल्यानंतर त्यांच्या कष्टाच्या प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. भायखळ्याच्या लेबर कॅम्पमध्ये, मुंबईतील गलिच्छ वस्त्यांमधील जगणे त्यांनी अनुभवले.

मुंबईतील त्यांचे सुरुवातीचे दिवस अत्यंत हालअपेष्टांचे होते. त्यांनी हमाली केली, गिरणीत काम केले, रस्ते झाडण्याचे काम केले, कुत्री सांभाळण्याचे काम केले. या कष्टप्रद जीवनामुळे त्यांना कामगार वर्गाच्या समस्यांची जवळून ओळख झाली. मुंबईच्या या वातावरणाने त्यांच्यातील साहित्याची भूक जागी केली. त्यांना जाणवले की, आपण जर साक्षर झालो नाही, तर आपण आपला आवाज जगापर्यंत पोहोचवू शकणार नाही. या अंतःप्रेरणेतून त्यांनी कोणाच्याही मदतीशिवाय अक्षर ओळख करून घेतली. रस्त्यावरील पाट्या वाचून, वर्तमानपत्रांचे तुकडे वाचून ते साक्षर झाले. त्यांनी अनुभवाच्या शाळेत शिक्षण घेतले. मुंबईने त्यांचा मनःपिंड घडविला आणि त्यांच्या राजकीय व सामाजिक भूमिकेला खऱ्या अर्थाने आकार प्राप्त झाला.

## टप्पा ३: मार्क्सवादी विचार, कामगार चळवळ आणि साहित्याची निर्मिती

१९३०-४० च्या दशकात मुंबईत मार्क्सवादी विचारांचे वारे वाहत होते. रशियातील क्रांतीने जगभरातील कष्टकऱ्यांना प्रेरणा दिली होती. मुंबईच्या लेबर कॅम्पमध्ये अण्णा भाऊंचा संबंध अनेक मार्क्सवादी कार्यकर्त्यांशी आला. 'लाल बावटा' कलापथकाच्या माध्यमातून ते कामगार चळवळीत सक्रिय झाले. मार्क्सवादी विचारसरणीने त्यांना आकर्षित केले, कारण या विचारात त्यांना शोषण मुक्तीचा मार्ग दिसला. लोककल्याणकारी राष्ट्रासाठी मार्क्सवाद हाच मार्ग आहे, अशी त्यांची धारणा

झाली. याच काळात त्यांनी लेखनास प्रारंभ केला. ते प्रथमतः लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी गण, गवळण, पोवाडे आणि लावणी यांसारख्या लोककला प्रकारांना नवीन क्रांतीचा आशय दिला. त्यांनी आपल्या साहित्यातून कामगारांच्या समस्या, त्यांचे लढे आणि शोषणाविरुद्धचा आवाज बुलंद केला. कम्युनिस्ट चळवळीच्या बहराच्या काळात अण्णा भाऊंनी आपल्या कलापथकाच्या माध्यमातून महाराष्ट्र पिंजून काढला. त्यांच्या शाहिरीने कामगारांमध्ये एक नवी चेतना निर्माण केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊंच्या शाहिरीने मराठी माणसाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवली. "माझी मैना गावावर राहिली । माझ्या जिवाची होतिया काहिली ।।" ही त्यांची लावणी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील एक अजरामर कलाकृती ठरली. या लावणीतून त्यांनी केवळ विरह मांडला नाही, तर मुंबई महाराष्ट्राला मिळवण्यासाठीचा तगादाही लावला.

## टप्पा ४: आंबेडकरी विचारांकडे कल, दलित साहित्य आणि निर्वाण

१९५६ हे वर्ष अण्णा भाऊंच्या आयुष्यातील आणि विचारांमधील एक मोठे वळण ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण आणि त्यापूर्वी झालेले ऐतिहासिक धर्मांतर या घटनांचा अण्णा भाऊंवर खोल परिणाम झाला. मार्क्सवादाकडून ते आंबेडकरी विचारांकडे वळू लागले. त्यांना हे उमजले की, भारतातील शोषण हे केवळ आर्थिक नसून ते सामाजिक आणि धार्मिकही आहे. मार्क्सला अभिप्रेत असणारी 'वर्गमुक्ती' आणि बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी 'वर्णमुक्ती' किंवा 'जातमुक्ती' यांचा समन्वय त्यांच्या साहित्यात प्रकट होऊ लागला. त्यांनी दलित साहित्य निर्मितीमध्ये स्वतःला झोकून दिले. १९५८ मध्ये मुंबईत भरलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे ते उद्‌घाटक होते. तिथे त्यांनी केलेले भाषण ऐतिहासिक ठरले. "पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे," हे त्यांचे विधान त्यांच्या बदललेल्या वैचारिक भूमिकेचे निदर्शक आहे. त्यांनी दलितांना स्वाभिमानाने जगण्याचे आवाहन केले आणि त्यांच्या साहित्यातून विद्रोहाचा नवा स्वर उमटला. जीवनाच्या अंतापर्यंत दारिद्र्याने त्यांची साथ सोडली नाही, तरीही त्यांनी आपले लेखन थांबवले नाही. १८ जुलै १९६९ रोजी या महान साहित्यिकाचे गोरेगाव, मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील एक लढाऊ पर्व संपले.

## अण्णा भाऊंच्या साहित्याची उपेक्षा : एक समीक्षात्मक विश्लेषण

अण्णा भाऊ साठे यांनी साधारणत: १९४० पासून लेखनास प्रारंभ केला होता. त्यांनी मुंबईतील गिरणी कामगार, कष्टकरी जनता, झोपडपट्टीतील जीवन या सर्वांचे प्रत्यक्ष अनुभवलेले जीवन साहित्यातून अभिव्यक्त केले. त्यांचे साहित्य विपुल, सकस आणि दर्जेदार असूनही, त्यांना त्यांच्या हयातीत आणि मृत्यूनंतरही दीर्घकाळ जाणीवपूर्वक उपेक्षेचा सामना करावा लागला. ही उपेक्षा केवळ अपघाती नव्हती, तर ती एका विशिष्ट मानसिकतेचा आणि रचनेचा परिणाम होती. या उपेक्षेची कारणे सामाजिक, राजकीय आणि साहित्यिक अशा तिन्ही स्तरांवर शोधता येतात.

## राजकीय उपेक्षा आणि सत्तेचे राजकारण

अण्णा भाऊ हे सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला कधीच गेले नाहीत. त्यांनी आपल्या साहित्यातून नेहमीच प्रस्थापित राजकीय व्यवस्थेवर आणि भांडवलशाहीवर प्रहार केले. ते कम्युनिस्ट चळवळीचे कार्यकर्ते होते आणि नंतर आंबेडकरी विचारांचे पुरस्कर्ते झाले. या दोन्ही भूमिका प्रस्थापित सत्तेला आव्हान देणाऱ्या होत्या. त्यामुळे त्यांना कोणत्याही राजकीय लाभापासून दूर राहावे लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांच्या कलापथकाने मोठी भूमिका बजावली होती, तरीही

मोरारजी देसाई सरकारने त्यांच्या कलापथकावर बंदी घातली होती. ही त्यांच्या कार्याची झालेली मोठी अवहेलना होती. राजकीय व्यवस्थेने त्यांना केवळ 'शाहीर' म्हणून मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यातील 'तत्त्वज्ञ' आणि 'कादंबरीकार' जाणीवपूर्वक दुर्लक्षित केला गेला.

## साहित्यिक उपेक्षा आणि समीक्षकांचा पूर्वग्रह

मराठी साहित्य अभ्यासक आणि समीक्षकांनीही अण्णा भाऊंना दीर्घकाळ उपेक्षित ठेवले. एकतर ते मार्क्सवादी असल्यामुळे आणि दलित समाजातून आल्यामुळे, प्रस्थापित अभिजन समीक्षकांनी त्यांच्या साहित्याला नाकारले. त्यांच्या साहित्यात 'सौंदर्यशास्त्र' नाही, अशी ओरड केली गेली. तत्कालीन समीक्षा दृष्टी ही केवळ भाषेच्या अलंकारिकतेवर आणि मध्यमवर्गीय मूल्यांवर आधारित होती आणि अण्णा भाऊंचे साहित्य हे जमिनीवरील माणसांचे साहित्य होते, जे साचेबंद समीक्षा दृष्टीला उमजले नाही.

वास्तविक, अण्णा भाऊंचे साहित्य हे जीवनाचे सौंदर्य मांडणारे आहे. त्यांनी शोषितांच्या संघर्षात जे सौंदर्य शोधले, ते समीक्षकांना दिसले नाही. दलित साहित्याच्या उदयानंतरही, अण्णा भाऊ मार्क्सवादी असल्यामुळे दलित साहित्य प्रवाहातही त्यांच्याकडे काही काळ दुर्लक्ष केले गेले. ही उपेक्षा म्हणजे आपल्याकडील पूर्वग्रहदूषित समीक्षा दृष्टीचाच परिणाम होता. अण्णा भाऊंनी प्रस्थापित साहित्याच्या सर्व चौकटी मोडीत काढल्या होत्या; परंतु समीक्षकांनी त्यांना त्याच चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते अपयशी ठरले. अण्णा भाऊंच्या साहित्याला 'प्रचारकी' ठरवून त्याची वाङ्मयीन किंमत कमी करण्याचा प्रयत्न झाला, परंतु काळाच्या ओघात त्यांचे साहित्य अधिक प्रखरतेने उजळून निघाले.

## साहित्यातील नावीन्य आणि क्रांती : एक नवीन क्षितिज

अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्यात जे योगदान दिले, ते केवळ संख्यात्मक नसून गुणात्मकदृष्ट्याही अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी प्रस्थापित साहित्याच्या मर्यादा ओलांडून एका नव्या साहित्यविश्वाची निर्मिती केली, नवी साहित्यमूल्ये मराठी साहित्याला प्रदान केली. त्यांच्या साहित्यातील नावीन्य हे त्यांच्या अनुभवाच्या प्रखरतेतून आणि वैचारिक स्पष्टतेतून आलेले आहे. यामुळे अण्णा भाऊंच्या साहित्याबद्दल समीक्षक डॉ. एस. एस. भोसले म्हणतात, "फुले-आंबेडकरांचा वारसा घेऊन उभे राहिलेले, मराठी साहित्य संस्कृतीची परंपरा नाकारणारे अण्णा भाऊ हे पहिले दलित बंडखोर लेखक आहेत."

## रोमँटिसिझमचा त्याग आणि वास्तववादाचा स्वीकार

अण्णा भाऊ ज्या काळात लेखन करत होते, तो काळ मराठी साहित्यात 'रोमँटिक' (स्वच्छंदतावादी) लेखनाचा सुवर्णकाळ होता. ना. सी. फडके हे कलावादाचे पुरस्कर्ते, तर वि. स. खांडेकर हे जीवनवादाचे पुरस्कर्ते होते. फडक्यांच्या कादंबऱ्यांमधील कल्पनाविलास आणि वि. स. खांडेकर यांच्यातील ध्येयवादाने मध्यमवर्गीय वाचकांना भुरळ घातली होती. या लेखनाचे विषय प्रामुख्याने मध्यमवर्गीय जीवन, प्रेम त्रिकोण, वैयक्तिक सुख-दुःख आणि कल्पनेचे इमले असे होते. अण्णा भाऊंनी या रोमँटिसिझमच्या पूर्णतः आहारी न जाता, समाजातील उपेक्षित, वंचित आणि कष्टकरी समूहाचे वास्तव चि रेखाटण्यास प्राधान्य दिले. त्यांनी साहित्यात 'जीवनवाद' आणला. त्याला रंजनात्मकतेची जोड दिली. अण्णा भाऊंनी तत्कालीन श्रृंगारिक लेखनावर कडाडून टीका केली होती. त्यांच्या मते, जेव्हा समाज गरिबीने आणि शोषणाने पिचलेला असतो, तेव्हा केवळ श्रृंगारावर लिहिणे हा गुन्हा आहे. अण्णा भाऊंनी साहित्याला जमिनीवर आणले आणि माणसाच्या अस्तित्वासाठी

चाललेल्या संघर्षाचे चित्रण केले. त्यांनी कल्पनेचे जग नाकारून वास्तवाचा स्वीकार केला. यासंदर्भात ते म्हणतात, 'मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. जीवनातील वास्तवच विस्मयकारक असते. त्याच्या सान्निध्यात कल्पना लुळीपांगळी ठरते." त्यांच्या साहित्यात झोपडपट्टीतील चिखल, महारवाड्याची गरिबी आणि गिरणी कामगारांचा घाम यांचे चित्रण आहे. हे चित्रण करताना त्यांनी कुठेही शब्दांचा फुलोरा किंवा व्याजाची हळहळ व्यक्त केली नाही, तर जे जसे आहे तसे मांडले.

## शूद्रातिशूद्रातील माणूस केंद्रस्थानी; नव्हे, नायक

अण्णा भाऊंच्या पूर्वी मराठी साहित्यात नायक हा प्रामुख्याने उच्चवर्णीय, सुशिक्षित आणि मध्यमवर्गीय असायचा. अण्णांनी ही परंपरा पूर्णत: मोडीत काढली. त्यांनी आपल्या कथा आणि कादंबऱ्यांचे नायकत्व 'गावाकुसाबाहेरच्या' माणसांना, म्हणजेच दलित, कष्टकरी आणि भटक्या विमुक्तांना बहाल केले. त्यांच्या साहित्यात मांग, महार, रामोशी, कोळी, भिल्ल यांसारख्या समाजातील शेवटच्या स्तरातील माणसे नायक म्हणून येतात. विशेष म्हणजे हे नायक गरीब असले तरी दुबळे, लाचार किंवा रडणारे नाहीत, तर ते अन्यायाविरुद्ध लढणारे, संघर्ष करणारे, लढाऊ वृत्तीचे आहेत. 'फकिरा' सारखा नायक जेव्हा ब्रिटिश सत्तेला आणि स्थानिक सावकारांना आव्हान देतो, तेव्हा तो केवळ एका जातीचा प्रतिनिधी राहत नाही, तर तो संपूर्ण शोषित वर्गाचा आवाज बनतो. अण्णा भाऊंचे नायक हे 'मातीतील' नायक आहेत. ते पराक्रमी आहेत, पण त्यांचा पराक्रम कुणा राजाची सेवा करण्यासाठी नसून तो आपल्या समाजाच्या हक्कासाठी आणि भुकेचा प्रश्न सोडवण्यासाठी आहे. हे नायकत्व प्रस्थापित साहित्याला पचणारे नव्हते, तरीही अण्णा भाऊंनी ते अत्यंत ताकदीने मांडले. त्यांनी सिद्ध केले की, पराक्रम आणि नायकत्व हे केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी नाही.

## स्त्रीकेंद्री कलाकृतींची निर्मिती

अण्णा भाऊ साठे यांनी स्त्रीजीवनाचे जे चित्रण केले आहे, ते अत्यंत मौलिक आणि पुरोगामी आहे. 'चित्रा', 'वैजयंता', 'चंदन', 'चिखलातील कमळ', 'फुलपाखरु', 'रत्ना', 'टिळा लावते मी रक्ताचा', 'आवडी' यांसारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी स्त्रीजीवनाचे विविध पैलू उलगडले आहेत. तमाशातील कलावंतीण, झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्रिया, वेश्या मानल्या गेलेल्या स्त्रिया आणि मुरळी यांसारख्या समाजाच्या लेखी 'वर्ज्य' किंवा 'कलंकित' असलेल्या स्त्रियांना त्यांनी आपल्या साहित्यात सन्मानाचे स्थान दिले. त्यांच्या नायिका केवळ सोशिक किंवा बळी ठरलेल्या नाहीत, तर त्या आपल्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेसाठी संघर्ष करणाऱ्या आहेत. अण्णा भाऊंनी स्त्रियांच्या लैंगिक शोषणाकडे लक्ष वेधले आणि त्यांना या शोषणातून मुक्त होण्याचे आवाहन केले. त्यांच्या नायिका आवडी, वैजयंता, रूपा किंवा रत्ना या तळागाळातील आहेत. त्या गरिबीत राहतात, पण त्यांचे चारित्र्य आणि त्यांची जिद्द हिमालयासारखी उंच आहे. अण्णा भाऊंनी या स्त्रियांच्या मनातील भावविश्व, त्यांच्या वेदना आणि त्यांच्या आकांक्षा अत्यंत बारकाईने टिपल्या आहेत. स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही केवळ सहानुभूतीची नसून ती समतेची आणि न्यायाची आहे.

## लोककला प्रकारांमधील परिवर्तन: शाहिरीचे नवे पर्व

अण्णा भाऊ साठे हे मुळात लोकशाहीर होते. त्यांनी पोवाडा, लावणी आणि तमाशा यांसारख्या पारंपरिक लोककला प्रकारांचा वापर लोकजागृतीसाठी केला; परंतु हे करताना त्यांनी या प्रकारांमधील पारंपरिकता, संकेतशरणता आणि केवळ श्रृंगारिकता नाकारून त्यांना नवा, क्रांतिकारक आशय दिला. यासंदर्भात त्यांनी पहिल्या दलित साहित्य संतेलनाच्या उद्‌घाटकीय भाषणात म्हटले आहे की, "जो कलावांत जनतेबरोबर नसतो, तो बंद खोलीतील कला मांडीवरच्या खुणा मोजते नि मांडीवरच्या खुणा मोजणारी आम्हा दलितांची क्ला नसते. आमची कला डमडम गोळीच्या खुणा मोजते. ती आमची कला, ते आमचे साहित्य त्याचबरोबर दलित स्त्रियांच्या गालावरच्या तिळावर जी सुंदर कलाकृती असेल ती कलाकृती आमची." या भूमिकेतूनच अण्णा भाऊंनी पोवाड्यातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडले. यापूर्वीच्या पारंपरिक पोवाड्यामध्ये राजे-महाराजे किंवा सरदार यांच्या वैयक्तिक शौर्याची स्तुती केलेली असायची. अण्णा भाऊंनी पोवाड्याचा हा उद्देश पूर्णपणे बदलला. त्यांनी कुणा एका व्यक्तीची स्तुती करण्यापेक्षा, तळागाळातील माणसांचे प्रश्न, त्यांचे लढे आणि जागतिक क्रांती मांडण्यासाठी पोवाड्याचा वापर केला. त्यांनी 'स्तालिनग्राडचा पोवाडा' लिहून जागतिक स्तरावरील फॅसिझमविरोधी लढ्याचे दर्शन घडवले. हा पोवाडा लिहिताना त्यांनी नाझी सैन्याच्या अत्याचाराविरुद्ध रशियन जनतेने दिलेल्या झुंजीचे ओजस्वी वर्णन केले. त्याचप्रमाणे 'अमळनेरच्या कामगारांचा पोवाडा' लिहून त्यांनी स्थानिक कामगारांच्या संघर्षाला वाचा फोडली. त्यांचा पोवाडा हा अन्यायाविरुद्ध लढण्याचे एक प्रभावी वैचारिक शस्त्र बनला. त्यांच्या पोवाड्यातून व्यक्त होणारी वीरश्री ही केवळ युद्धाची नव्हती, तर ती मानवी मुक्तीची होती.

मराठी साहित्यामध्ये लावणी हा प्रकार प्रामुख्याने श्रृंगार आणि मनोरंजनासाठी ओळखला जातो. अण्णा भाऊंनी लावणीला एक स्वतंत्र उंची प्राप्त करून दिली. त्यांनी लावणीमध्ये 'वर्तमान वास्तव' आणि 'सामाजिक जाणीव' आणली. 'मुंबईची लावणी' ही याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. या लावणीत त्यांनी मुंबईतील वर्गीय जाणीव प्रखरपणे मांडली आहे. "मलबार हिल इंद्रपुरी, कुबेराची वस्ती, तिथे सुख भोगती..." आणि "परळात राहणारे, रात्रंदिवस राबणारे, मिळेल ते खाऊन घाम गाळती..." असा मुंबईतील भीषण विरोधाभास त्यांनी या लावणीतून स्पष्ट केला. ही लावणी केवळ करमणुकीचे साधन न राहता, ती महानगरीय जीवनाचा एक जिवंत आरसा बनली. त्यांनी लावणीतून मुंबईचे जे भौगोलिक आणि सामाजिक चित्रण केले, ते आजही समाजशास्त्रीय अभ्यासासाठी महत्त्वाचे आहे. मुंबईची गर्दी, तिथली हिंस्रता, तिथले शोषण आणि तिथल्या श्रमिकांचे कष्ट अण्णा भाऊंनी लावणीच्या लयीत अत्यंत प्रभावीपणे गुंफले.

पूर्वी पारंपरिक तमाशात अनेकदा महिलांची चेष्टा केली जायची किंवा केवळ श्रृंगारिक आणि अश्लील संवाद असायचे. अण्णा भाऊंनी तमाशाचे रूपांतर 'लोकनाट्यात' केले. त्यांनी लोकनाट्यातून सावकारशाही, सत्तेचा मुजोरपणा, वसाहतवादी मनोवृत्ती आणि शेतकरी-कामगारांचे शोषण मांडले. त्यांनी कृष्णाच्या गवळणींमधील श्रृंगार टाळून लोकजीवनातील प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्या लोकनाट्यामुळे तमाशा या कलेला एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि ती परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम बनली. त्यांच्या लोकनाट्यांमध्ये 'शोषक' आणि 'शोषित' असा स्पष्ट संघर्ष पाहायला मिळतो. 'अकलेची गोष्ट', 'शेटजींचे इलेक्शन' यांसारख्या लोकनाट्यांमधून त्यांनी लोकशाहीतील विसंगतीवर आणि भांडवलशाहीवर मार्मिक भाष्य केले आहे. त्यांच्या लोकनाट्यांनी खेड्यापाड्यातील लोकांमध्ये एक नवी राजकीय आणि सामाजिक चेतना निर्माण केली आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ग्रामीण आणि महानगरीय अशा दोन्ही जगांचे अत्यंत सूक्ष्म आणि प्रखर चित्रण केले आहे. मराठी साहित्यात क्वचितच असे लेखक आढळतात ज्यांनी या दोन्ही क्षेत्रांवर सारख्याच ताकदीने लेखन केले आहे.

### महानगरीय जीवन वास्तव

अण्णा भाऊंनी मुंबईचे जे चित्रण केले आहे, ते अत्यंत दाहक आहे. त्यांच्या मते मुंबई ही केवळ एक शहर नसून ती शोषणाचे एक मोठे केंद्र आहे. त्यांनी मुंबईतील 'चाळ संस्कृती' आणि 'झोपडपट्टीतील जीवन' यांचे चित्रण केले. 'मुंबईची लावणी' मध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे, एका बाजूला मलबार हिलवर राहणारे श्रीमंत लोक आणि दुसऱ्या बाजूला परळ-लालबागमध्ये राहणारे कष्टकरी कामगार यांच्यात मोठी दरी आहे. तसेच त्यांच्या कथांमध्ये मुंबईतील गुन्हेगारी, बेरोजगारी, कामगारांचे संप आणि पोलिसांकडून केले जाणारे अत्याचार यांचे चित्रण येते. मुंबईतील यंत्रसंस्कृतीने माणसाचे जगणे यंत्रमय केले आहे, हे त्यांनी दाखवून दिले. गिरणी कामगारांच्या आयुष्यातील अनिश्चितता आणि त्यांचे संघटित लढे अण्णा भाऊंनी अत्यंत जवळून पाहिले होते. त्यांच्या साहित्यात मुंबई ही केवळ पार्श्वभूमी नसून ती एक जिवंत पात्र म्हणून येते, जी माणसाला गिळंकृत करायला टपलेली आहे. मुंबईतील 'लेबर कॅम्प' मधील जगणे, तिथल्या गलिच्छ वस्त्या आणि तिथल्या माणसांची जिद्द अण्णा भाऊंनी आपल्या लेखणीतून अमर केली.

### ग्राम वास्तव :

अण्णा भाऊंनी ग्रामीण साहित्यात वारणेच्या खोऱ्यातील जीवनाचे चित्रण केले. तेथील मातीचा वास, लोकांची बोलीभाषा आणि तेथील संघर्ष यांचे त्यांनी जिवंत चित्र उभे केले. ग्रामीण भागातील जातीव्यवस्था, सावकारशाही आणि पोलिसांचा जाच त्यांनी 'फकिरा', 'वारणेचा वाघ' यांसारख्या कादंबऱ्यांमधून मांडला. त्यांच्या ग्रामीण साहित्यात निसर्ग हा केवळ सौंदर्यासाठी येत नाही, तर तो माणसाच्या जगण्याशी जोडलेला असतो. दुष्काळ, पूर आणि नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रामीण माणसाचे होणारे हाल त्यांनी मांडले. त्याचबरोबर ग्रामीण भागातील शौर्य आणि इमानदारीचेही त्यांनी दर्शन घडवले. अण्णा भाऊंनी ग्रामीण भागातील 'मांग' आणि 'महार' वस्त्यांमधील जगणे साहित्यात आणले. त्यांच्या साहित्यातील ग्रामीण भाग हा केवळ शेतीचा भाग नसून तो संघर्षाचा आणि अस्मितेचा भाग आहे.

### मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद :

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा त्यांनी समन्वय साधला आहे. अण्णा भाऊंनी या दोन्ही विचारसरणींना आपल्या जीवनात आणि साहित्यात स्थान दिले. अण्णा भाऊंवर सुरुवातीच्या काळात मार्क्सवादाचा मोठा प्रभाव होता. रशियन क्रांतीने त्यांना प्रभावित केले होते. त्यांनी आपल्या साहित्यातून वर्गसंघर्षाचे चित्रण केले. भांडवलदार आणि कामगार, जमीनदार आणि शेतमजूर यांच्यातील संघर्षाला त्यांनी महत्त्व दिले. "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे." या त्यांच्या ओळीत मार्क्सवादातील परिवर्तनाची आणि क्रांतीची ओढ आहे. त्यांनी साहित्याला क्रांतीचे शस्त्र मानले. रशियाला दिलेल्या भेटीनंतर त्यांचा हा विश्वास अधिक दृढ झाला. त्यांनी रशियन जनतेचे कौतुक केले आणि तिथल्या व्यवस्थेचा अभ्यास केला.

१९५६ च्या सुमारास अण्णा भाऊ आंबेडकरी विचारांकडे वळले. त्यांना हे उमजले की, भारतात केवळ वर्गमुक्ती पुरेशी नाही, तर जातमुक्ती ही त्याहून अधिक महत्त्वाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला स्वाभिमानाचा मंत्र त्यांनी आत्मसात

केला. “पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या, कामगारांच्या तळहातावर तरली आहे.” हे त्यांचे विधान त्यांच्यातील आंबेडकरी जाणीव स्पष्ट करते. तसेच ‘जग बदल घालुनि घाव । सांगून गेले मला भीमराव ।’ हे विधान त्यांच्या भूमिकेचे द्योतक आहे.

अण्णा भाऊंनी या दोन्ही विचारांचा समन्वय साधला. त्यांनी केवळ मार्क्सवाद किंवा केवळ आंबेडकरवाद असा संकुचित विचार केला नाही. त्यांच्या मते, आर्थिक समता आणि सामाजिक समता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून हा समन्वय अत्यंत प्रभावीपणे मांडला. ‘फकिरा’ या कादंबरीत हा समन्वय स्पष्टपणे दिसतो. फकिरा हा केवळ एका जातीचा प्रतिनिधी नसून तो संपूर्ण शोषित वर्गाचा नायक आहे. अण्णा भाऊंचा हा समन्वय आजही भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक ठरतो.

थोडक्यात, अण्णा भाऊ साठे हे विसाव्या शतकाच्या मध्यावरचे मराठीतील एक प्रतिभावंत साहित्यिक होते. नी आपल्या ४९ वर्षांच्या आयुष्यात जे काही अफाट कार्य केले, ते पाहून थक्क व्हायला होते. ते काळाच्या पुढचा विचार करणारे महामानव होते. त्यांच्या साहित्याने मराठी साहित्याला एक नवीन दिशा दिली, मराठी साहित्याची कक्षा रुंदावली. त्यांनी उपेक्षितांना केंद्रस्थानी आणले, स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि साहित्याला परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांच्यावर झालेली उपेक्षा ही केवळ त्यांची नव्हती, तर ती संपूर्ण शोषित वर्गाच्या प्रतिभेची उपेक्षा होती; परंतु आज अण्णा भाऊंचे साहित्य जगभर वाचले जात आहे. त्यांच्या साहित्याचे अनेक भाषांत अनुवाद झाले आहेत. अण्णा भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने ‘लोकशाहीर’ आणि ‘लोकसाहित्यिक’ होते. त्यांनी आपल्या लेखणीतून आणि शाहिरीतून क्रांतीची मशाल पेटवली. त्यांचे जीवन आणि साहित्य हा एक संघर्षाचा प्रवास आहे, जो आपल्याला नेहमीच अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि माणुसकी जपण्याची प्रेरणा देतो. अण्णा भाऊंच्या साहित्यातील ‘माणूस’ हा नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे आणि म्हणूनच त्यांचे साहित्य अजरामर आहे. अण्णा भाऊंनी जे वास्तव मांडले, ते आजही तितकेच सत्य आहे. जोपर्यंत समाजात विषमता, शोषण आणि अन्याय राहील, तोपर्यंत अण्णा भाऊंचे साहित्य हे शोषितांना प्रेरणा देत राहील. विविध वाङ्मयप्रकारांतून त्यांनी विपुल स्वरूपाचे लेखन केले. त्यांनी अन्य लेखकांना वर्ज्य असणारे विषय हाताळले. प्रस्थापित साहित्यिकांनी निर्माण करून ठेवलेल्या चौकटी त्यांनी मोडीत काढल्या. त्यांच्या लेखनामुळे मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारल्या.

## संदर्भ :


१. डांगळे, अर्जुन. उपाध्ये, नीला. नाईक-पेंडसे, वसुंधरा. सावरकर, सुभाष. *लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय.* मुंबई : लोकवाङ्मय गृह, प्रथमावृत्ती : १ ऑगस्ट १९९८.

२. पी. विठ्ठल व दुडुकनाळे, राजेश्वर. *जनवादी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे.* पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती : १ ऑगस्ट २०१७.

३. साठे, अण्णा भाऊ. *फकिरा.* मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन.

४. सगट, अंबादास. *अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय.* पुणे : भारतीय विचारसाधना प्रकाशन, प्र. आ. २०१२.

५. पगारे, बापू. *अण्णा भाऊ साठे : जीवन आणि साहित्य.* पुणे: सुगावा प्रकाशन.

६. *लोकराज्य* : अण्णा भाऊ साठे विशेषांक, महाराष्ट्र शासन.